महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/सेवक प्रतिनिधी/डी-४/८९
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे कार्यालय,
दिनांक १३-४-८९

प्रति,
१) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व विभाग)
३) तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**विषय : महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम कलम ७३ (बब) अनुसार संचालक मंडळावर सेवक प्रतिनिधी घेण्याबाबत.**

## नागरी सहकारी बँका ......

अनेक सहकारी बँकांनी, ज्यांना महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम कलम ७३ (बब) च्या तरतुदी लागू आहेत. अद्यापि या कलमाच्या तरतुदी प्रमाणे काही बँकांच्या संचालक मंडळावर सेवक प्रतिनिधी नियुक्त केलेले नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. तरी आपल्या कार्यालयातील ज्या नागरी सहकारी बँकांना कलम ७३ (बब) च्या तरतुदी लागू आहेत त्या बँकांच्या सेवक प्रतिनिधींना संचालक मंडळावर प्रतिनिधीत्व देण्याबाबत पाठपुरावा करावा. तर काही बँकांनी कलमाची अंमलबजावणी केलेली नसेल आणि त्यानुसार त्यांचे पोटनियमांमध्ये दुरुस्ती केली असेल किंवा अंमलबजावणी करणे बाबत टाळाटाळ/दिरंगाई केली असेल अशा बँकांना आवश्यकतेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम कलम १४ अन्वये अशा तरतुदीच्या अंमलबजावणी सबंधाने पोटनियमामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करणे बाबत सक्ती करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ज्या नागरी बँकांना सदरचे कलम लागू आहे व ज्यांनी अद्यापी या तरतुदीप्रमाणे कार्यवाही केलेली नाही अशा बँकांची माहिती (नावासह) या कार्यालयास १५ दिवसात कळवावी. ही विनंती.

सही
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे करीता.

No.CSL-1493/1162/CR-47/15-C,
Cooperation and Textiles Department
Mantralaya Annexe, Bombay- 400 032.
Dated the 30th August, 1993.

To,
**The Commissioner for Cooperation and,**
**Resistrar, Cooperative Societies, Maharashtra State, Pune.**

**Subject : Delegation of powers under various provisions of the Maharashtra Coopv. Societies Act, 1960 and the Rules, made thereunder.**

Please refer to Government order No. CSL-1493/1162/CR-47/ 15-C, dated the 7th August, 1993 delegating powers of the Registrar to the Subordinate Officers under various provisions of the Maharashtra Cooperative Societies, Act, 1960 and the Rules made thereunder.

2) In this respect it is pointed out that the aforesaid order has been issued in supersession of Government orders Agriculture and Cooperation Department No. CSL-1481/24982/ 15-C (87), dated the 1st July, 1981 and No. CSL-1487/34589/180/15-C, dated the 22nd June, 1988. For your information Government has isssued the following orders, from time to time, dalegating the powers of the Registrar to the Officers of the Department,

1) No. CSL-1481/24982/15-C (87), dated the 1st July, 1981
2) No. CSL-1479/11320/15-C, dated the 6th October, 1981
3) No. CSL-1481/24982/15-C (87), dated the 6th August, 1986
4) No. CSL-1481/24982/15-C (87), dated the 26th Augest, 1986
5) No. CSL-1486/39350/CR-164/15-C, dated the 10th November, 1986
6) No. CSL-1486/39350/CR-164/15-C, dated the 2nd June, 1987
7) No. CSL-1487/34589/180/15-C, dated the 22nd June, 1988
8) No. CSL-1488/CR-141/15-C, dated the 28 July, 1988
9) No. CSL-2189/517/58/15-C, dated the 26th April 1989
10) No. CSL-1487/41038/CR-319/15-C, dated the 18th May, 1989
11) No. CSL-2190/8557/15-C, dated the 16th May, 1990,
12) No. CSL-2189/CR-229/15-C dated the 20th February, 1991
13) No. CSL-1092/2453/95/15-C, dated the 23rd March, 1993

Queries have now been raised by some of the Officers whether the latest order dated the 7th August, 1993 supersedees all the above orders. To remove the doubts, it is clarified that the order dated the 7th August 1993 is made in supersession of the orders dated 1st July, 1981 and 22nd June, 1988 and sherefore all the other orders with regard to delegation of powers still remain in force. You are, therefore, requested to ensure that all the implementing Officers exercise the powers delegated to them accordingly .

**Yours,**
**Sd/-**
**Deputy Secretary to Government,**
**Cooperation and Textiles Department**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/ डी-४ / पत आ. दु. / २७१७ सन ९७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय,
दिनांक : २६ मार्च, १९९७

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी सेवानियम व भविष्यनिर्वाह निधी तयार करणेबाबत.**

**संदर्भ : या कार्यालयाचे जा. क्र. ना. बँका / डी-४ / पतसंस्था / ड / दिनांक ७-५-९६**

उपरोक्त संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

सदर परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श पोटनियम स्विकारणे बाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर आदर्श उपविधीतील उपविधी क्र. फ. १.९ (१८) अन्वये निबंधकाच्या संमतीने नोकरांकरीता सेवानियम भविष्य निर्वाह निधी नियम तयार करावेत अशी तरतूद आहे.

नागरी सहकारी पतसंस्थांचे सेवा नियम निबंधकांनी मंजूर करण्याबाबत आदर्श पोटनियमातील तरतूद यथोचित नाही. सेवा नियम व शर्ती या संस्थेचे हित लक्षात घेवून व कर्मचाऱ्यासमवेत चर्चा करुन संस्थेच्या व्यवस्थापनाने तयार कराव्यात व त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेवून ते नियम अंमलात आणावेत हे सहकारी संस्थांच्या स्वायत्तेस अनुरुप आहे. ही बाब लक्षात घेता सेवानियम व भविष्यनिर्वाह निधी नियमांना निबंधकांनी मंजुरी देण्याबाबतची तरतूद उपविधीतून वगळयण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील पतसंस्थाना सूचना देण्यात यावी. तसेच संस्थांच्या व्यवस्थापक समितीने कर्मचाऱ्यांशी चर्चा करुन कर्मचाऱ्यांसाठी सेवा नियम व भविष्यनिर्वाह निधी नियम तयार करुन सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सदर नियम अंमलात आणावेत असेही सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना कळविण्यात यावे.

मा. आयुक्त यांचे मान्यतेने

सही /-
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकरिता